आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१ डिसेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यविधानसभा निवडणुकांमध्ये ईव्हीएम यंत्रामध्ये फेरफार झाल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तिविरोधात मुंबई पोलिसांच्या सायबर विभागाकडून गुन्हा दाखल

- भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा आज प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत होणार समारोप

- तेलंगणात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत सात नक्षलवादी ठार

- फेंगल चक्रिवादळाची तामिळनाडू आणि पुद्दुचेरीच्या किनारपट्टीला धडक, चार राज्यांना चक्रिवादळाचा फटका, वीज कोसळून तीन जण दगावले

**आणि**

- आशिया चषक हॉकी स्पर्धेत आज भारताचा सामना दक्षिण कोरियासोबत होणार

**<><><><><>**

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये फेरफार झाल्याचा दावा करणारी एक ध्वनीचित्रफित समाजमाध्यमांवर फिरत आहे. या ध्वनिचित्रफितीतल्या व्यक्तीविरोधात मुंबई पोलीसांच्या सायबर विभागाने गुन्हा दाखल केला आहे. याबाबत राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे या व्यक्तिविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३, तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००० या अंतर्गत गुन्हा दाखल केल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं समाजमाध्यमावरच्या निवेदनातून दिली.

गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीने आपल्या ध्वनीचित्रफितीत इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रामध्ये फेरफार करून ते हॅक केल्याचा केलेला दावा खोटा आणि तथ्यहीन असल्याचंही राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं म्हटलं आहे. इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्र हे स्वतंत्र यंत्र असून, त्याला कोणत्याही कोणत्याही नेटवर्क, वाय - फाय किंवा ब्लूटूथला जोडता येत नाही, त्यामुळे या यंत्रासोबत छेडछाडीची कोणतीच शक्यता नाही, त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयानंही अनेक वेळा या यंत्रांवर विश्वास व्यक्त केला असल्याचं निवडणूक कार्यालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यात माळशिरसमधल्या मारकडवाडीतली मतदान प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राबवली गेली असं सांगत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांची फेरमतदानाची मागणी फेटाळली आहे. मारकडवाडीतल्या ग्रामपंचायतीने मतदान प्रक्रियेची खात्री करण्यासाठी पुन्हा एकदा फेरमतदानाच्या मागणीचा ठराव निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पाठवला होता. मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅटवर होणारं मतदान योग्य आहे की नाही, याची मॉकपोलव्दारे चाचणी दोन्ही बाजूच्या उमेवारांच्या उपस्थितीत झाली. त्यावरचे आक्षेप तेव्हा नोंदवले नाहीत तेव्हा मतदानाची पुन्हा खात्री करण्यासाठी शासकीय यंत्रणा अथवा ईव्हीएम मशीन वापरता येणार नाही असं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. निकाल लागून दोन आठवडे झाल्यामुळे फेरमतदानही घेता येणार नाही, असा खुलासाही त्यांनी केला आहे.

<><><><><>

भुवनेश्वर इथे आयोजित अखिल भारतीय महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेच्या शेवटच्या दिवशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विविध राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांशी संबंधित सुरक्षेशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करत आहेत. या परिषदेत राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी आव्हानांवर उहापोह करण्यात येत आहे. भारताच्या

विकासात अडथळा आणणाऱ्या बाबी, सीमेपलीकडून होणारा दहशतवाद आणि तस्करी, देशांतर्गत नक्षलवादाचं आव्हान या विषयांचा समावेश आहे. या परिषदेला २०० पेक्षा अधिक अधिकाऱ्यांची उपस्थिती आहे.

ओडिशात भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत समारोप होत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते परिषदेचं २९ तारखेला उद्घाटन करण्यात आलं होतं. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलिस महासंचालक, तसंच केंद्रीय राखीव पोलिस बल, रॉ, राष्ट्रीय सुरक्षा दल - एनएसजी, गुप्तचर विभाग आणि विशेष सुरक्षा दल - एसपीजीचे प्रमुख या परिषदेला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

जातीपातींना शास्त्रात स्थान नाही, तरीही जातीभेद सुरूच आहेत, अशी खंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केली. ते आज नागपूर इथं एका कार्यक्रमात बोलत होते. आपली संस्कृती एका भाषेपुरती आणि जातीपुरती मर्यादित नाही, ती सर्वांची आहे, मात्र गेल्या दीडशे वर्षात संकुचित वृत्ती वाढत आहे, असं भागवत म्हणाले. फक्त आपल्यापुरतं पाहायची वृत्ती योग्य नाही, असंही भागवत यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

जबरदस्तीने होणारं धर्मांतर रोखण्यासाठी धर्मांतर विरोधी विधेयकाच्या मसुद्याला राजस्थान मंत्रिमंडळानं मंजुरी दिली असून 'राजस्थान बेकायदेशीर धर्मांतर बंदी विधेयक २०२४' या नावाचं हे विधेयक आता राजस्थान विधानसभेच्या आगामी अधिवेशनात मांडलं जाणार आहे. जर एखाद्या व्यक्तीला धर्मांतर करायचं असेल तर, त्या व्यक्तीला ६० दिवस अगोदर जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज द्यावा लागेल, असा प्रस्ताव या विधेयकात असल्याची माहिती राजस्थानचे संसदीय कामकाज मंत्री जोगाराम पटेल यांनी दिली आहे.

धर्मांतर सक्तीने किंवा कोणत्याही प्रलोभनाखाली झालेलं नाही, असं आढळून आलं तर, अर्जदाराला धर्मांतराची परवानगी दिली जाईल. या विधेयकाचा कायदा झाल्यानंतर कोणतीही व्यक्ती किंवा संस्था चुकीची माहिती, फसवणूक, जबरदस्ती किंवा अवाजवी प्रभाव वापरून एखाद्या व्यक्तीचं धर्मांतर करू शकणार नाही.

**<><><><><>**

तेलंगणात, मुलुगु जिल्ह्यात आज सकाळी पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत किमान सात जहाल नक्षलवादी ठार झाले. या नक्षल्यांमध्ये राज्य समितीचा सचिव भद्रू उर्फ पपण्णा हा विजापूरचा असून इतर दोन राज्य समिती सदस्यांचा समावेश आहे. पोलिसांचे खबरे असल्याचं सांगून त्यांनी दोन आदिवासींना ठार मारल्यानंतर काही वेळातच ही चकमक झाली.

एटुरनगरम भागात नक्षलविरोधी कमांडो पथकाला आज सकाळी शोध मोहिमेदरम्यान नक्षलवाद्यांच्या हालचालींबाबत माहिती मिळाल्यानंतर हा गोळीबार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी दोन एके-४७ रायफलही त्यांच्याकडून जप्त केल्या आहेत.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या फेंगल चक्रिवादळाने काल रात्री तामिळनाडू आणि पुद्दुचेरी किनारपट्टीवर कराईकल आणि महाबलीपुरम दरम्यान धडक दिली. ताशी ९० किलोमीटरपर्यंत वाऱ्यांसह तामिळनाडू आणि शेजारच्या पुद्दुचेरीमध्ये २० सेंटीमीटर्सपर्यंत पाऊस पडला. वीज अंगावर पडून काल तीन जणांचा मृत्यू झाला. पावसामुळं बस, रेल्वे आणि विमान सेवांसह सार्वजनिक वाहतुकीवर परिणाम झाला. ही वाहतूक आता हळूहळू पूर्वपदावर येत आहे. असुरक्षित भागातील लोकांना अधिकाऱ्यांनी सुरक्षित आश्रयस्थानांमध्ये हलवलं आहे. भारतीय हवामान विभागानं तामिळनाडू, दक्षिण आंध्र प्रदेश, केरळ आणि

अंतर्गत कर्नाटकातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर रेड अलर्ट जारी केला आहे.

**<><><><>**

ओमानमध्ये सुरू असलेल्या कनिष्ठ गटाच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत आज भारताचा सामना दक्षिण कोरियासोबत होणार आहे. अ गटात असलेल्या भारताचा हा अखेरचा गटसाखळी सामना असेल. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता हा सामना सुरू होईल. भारतानं याआधीचे आपले तिन्ही सामने जिंकले असून, सध्या भारत गुणतालिकेत ९ गुणांसह आघाडीवर आहे.
काल झालेल्या सामन्यांत भारतानं भारतानं चिनी तायपेईचा १६ - ० असा पराभव केला, तर दक्षिण कोरियाला जपानकडूडन २-० असा पराभव पत्कारावा लागला. या स्पर्धेचा अंतिम सामना येत्या ४ डिसेंबरला होणार आहे.

**<><><><>**

अमेरिकेत कथित लाचखोरी प्रकरणी केल्या गेलेल्या आरोपांमध्ये तथ्य नसल्याचा दावा उद्योगपती गौतम अदानी यांनी केला आहे. जयपूर इथं आयोजित एका पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. आपल्या कंपनीने कोणत्याही प्रकारे नियमांचं उल्लंघन केलेलं नसून अशा प्रकारचे आरोप होण्याची ही पहिली वेळ नाही, असं अदानी यावेळी म्हणाले. अदानी ग्रीन एनर्जी या कंपनीवर सौरप्रकल्पासाठी २ हजार २५० कोटी रुपयांची लाच दिल्याचा आरोप अमेरिकेत न्यूयॉर्क इथल्या न्यायालयात झाला आहे. मात्र, अदानी समुहाने हे आरोप फेटाळले आहेत.

**<><><><>**

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या पिसे इथल्या धरणाच्या दरवाजांमध्ये बिघाड झाल्यामुळे तांत्रिक दुरुस्तीचं काम आज हाती घेतलं आहे. या तातडीच्या दुरुस्ती कामामुळे मुंबई शहर - उपनगर, ठाणे आणि भिवंडी भागाला  होणाऱ्या पाणी

पुरवठ्यात १० टक्के कपात केली जाणार आहे. खबरदारीचा उपाय म्हणून उपरोक्त नमूद कालावधीत नागरिकांना पाणी काटकसरीने आणि जपून वापरायचं आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनासनं केलं आहे.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्याला इसापूर धरणातून रब्बी हंगामासाठी तीन पाणीपाळ्या तर उन्हाळी हंगामात चार पाणीपाळ्या देण्याच्या नियोजनास पाटबंधारे विभागानं मान्यता दिली. उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर डावा कालवा व इसापूर उजवा कालवा आणि त्याअंतर्गत असलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे प्रत्येक पाणीपाळीच्या कालवा संचलनाच्या प्रस्तावीत कार्यक्रमानुसार प्राप्त मागणीनुसार सिंचनासाठी पाणी सोडण्यात येईल, असं विभागानं कळवलं आहे.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुक्यातल्या माडणी इथं झालेल्या अपघातात एकजण मरण पावला तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने हा अपघात झाला. अपघातानंतर ट्रक चालक फरार झाला असून, पोलीस पुढील कारवाई करत आहेत.

**<><><><><>**

गडचिरोलीमध्ये वैनगंगा नदीत बुडून काल एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाला, तर तिघा जणांना वाचवण्यात यश आलं आहे. चारही मुलं फिरण्यासाठी नदीवर गेली होती.

**//<><><><><>//**